# भारतीय राज्यघटनेतील अनुसूचित जातींशी संबंधित घटनात्मक तरतुदी

सारिका धनपाल माळगे संशोधक विद्यार्थी, राज्यशास्त्र विभाग, शिवाजी विद्यापीठ, कोल्हापूर.
मार्गदर्शकडॉ. शार्दुल माणिकराव सेलूकर. सहयोगी प्राध्यापकराज्यशास्त्र विभाग, विठ्ठलराव पाटील महाविद्यालय, कळे.

---

**प्रस्तावना**

कोणत्याही कल्याणकारी राज्याची संकल्पना ही राज्यघटना व त्याचा योग्य वापर यावर ठरते. जर देशाचा कारभार बहुमान्य नियमानुसार चालला, तरच देशातील नागरिकांचे जीवन सुखी व समाधानी होते. देश चालवण्यासाठी व कल्याणकारी राज्याची संकल्पना पूर्ण करण्यासाठी ज्या बहुमान्य नियमांची गरज असते त्या नियमांच्या संग्रहाला राज्यघटना असे म्हणतात. जर राज्यघटना नसेल तर शासनकर्ते स्वतःच्या स्वार्थानुसार नियम बनवून नागरिकांचे जीवन असाह्य, अशांत व भीतीग्रस्त करून स्वतःच्या देशातील नागरिकांना गुलाम बनवू शकतात. म्हणून कल्याणकारी राज्यासाठी राज्यघटना हा अविभाज्य व अति महत्त्वाचा घटक आहे.

थोडक्यात राज्यघटना म्हणजे अशा बहुमान्य मूलभूत नियमांचा संग्रह की ज्याद्वारे सार्वभौमत सत्तेची वाटणी करून, ती सार्वभौम सत्ता कोणी व कशी वापरावी यासंबंधी बहुमान्य तत्वे निश्चित केली जातात. भारत सरकार अधिनियम 1935 मध्ये ‘ वंचित वर्गाला अनुसूचित जातीमध्ये रूपांतरित करण्यात आले आणि 1936 मध्ये विविध प्रांतात अनुसूचित जातींची स्वतंत्र सूची तयार करण्यात आली. आणि त्यांची सूची ही संबंधित प्रांतात अधिसूचित करण्यात आली. तिथे या जमातींचा अस्तित्व उल्लेखनीय होतं. भारत सरकार अधिनियम 1935 नुसार अनुसूचित जाती आणि अनुसूचित जमातींना संबंधित संवर्गामध्ये आणण्याचा फायदा असा झाला की केंद्रीय प्रतिनिधित्व आणि प्रांत विधानसभा मध्ये त्यांना राजकीय प्रतिनिधित्व मिळालं. पहिल्यांदा 1943 मध्ये अनुसूचित जातीसाठी 8.33% जागा आरक्षित ठेवल्या गेल्या. जून 1943 मध्ये आरक्षण वाढवून 12.5% करण्यात आले आणि अशा प्रकारे लोकसंख्येच्या प्रमाणात अनुसूचित जातींना प्रतिनिधित्व देण्याचा प्रयत्न कर ण्यात आला.

वर्षानुवर्ष समाजाच्या मुख्य प्रवाहापासून दूर असलेल्या अनुसूचित जातींना समाजाच्या मुख्य प्रवाहात आणण्यासाठी व त्यांच्या हितसंबंध जपण्यासाठी राज्यघटनेमध्ये काही घटनात्मक तरतुदींचा समावेश करण्यात आलेला आहे. सदर संशोधन पेपर मध्ये भारतीय राज्यघटना या संकल्पनेचा अभ्यास करण्यात आला आहे. तसेच अनुसूचित जाती म्हणजे काय? त्याचबरोबर भारतीय राज्यघटनेतील अनुसूचित जातींच्या संबंधी घटनात्मक तरतुदींचा आढावा घेण्यात आला आहे.

**संशोधनाची उद्दिष्टे**

1)राज्यघटना या संकल्पनेचा अभ्यास करणे .
2) अनुसूचित जाती ही संकल्पना समजून घेणे.
3) भारतीय राज्यघटनेतील अनुसूचित जातींच्या संबंधित घटनात्मक तरतुदींचा अभ्यास करणे.

**संशोधनाची गृहितके**

1) राज्यघटना या संकल्पनेचा अभ्यास केलेला आहे.
2) अनुसूचित जाती संकल्पनेचा अभ्यास केलेला आहे.
3)भारतीय राज्यघटनेतील अनुसूचित जातींच्या संबंधित घटनात्मक तरतुदींचा आढावा सविस्तरपणे घेतला आहे.

**संशोधन पद्धती**

सदर संशोधन पेपर लिहिण्यासाठी द्वितीय साधनांचा वापर करण्यात आला आहे. यामध्ये विविध ग्रंथांचा, वर्तमानपत्रे, मासिके, नियतकालिके, इंटरनेट प्रणाली आदी साधनांचा अवलंब करण्यात आलेला आहे.

**विषय विवेचन**

राज्यघटना ‘ Constitution ‘ ही संज्ञा ‘Consituere' या लॅटिन शब्दावरून आला आहे. याचा अर्थ स्थापन करणे, निर्माण करणे, किंवा रचना असा होतो. फ्रेंच भाषेत ‘ Constiutio' हा शब्द नियमन व आज्ञावली साठी वापरला जाऊ लागला. नवीन ऑक्सफर्ड अमेरिकन शब्दकोशात “ राज्यघटना म्हणजे असा एक पायाभूत तत्वांचा संचय किंवा प्रस्थापित पायंडे, ज्यांच्या आधारे एखादे राज्य किंवा संघटन प्रस्थापित करता येते.

भारतीय राज्यघटना म्हणजे असा एक मूलभूत तत्वांचा संच किंवा प्रस्थापित संकेत आहे, ज्या आधारे भारताची शासन व्यवस्था कार्यान्वित होते. भारताची राज्यघटना या राष्ट्रांचा प्राथमिक कायदा किंवा मूलभूत कायदा किंवा सर्वोच्च कायदा मानला जातो

राज्यघटनेची व्याख्या खालील प्रमाणे सांगता येईल.

1)अरिस्टॉटल यांच्या मते " राज्यघटना ही एक व्यवस्था आहे. ज्यात घटक भाग असलेल्या नागरिकांना एकमेकांच्या संबंधात नियमित केले जाते. "

2) जॉन ऑस्टिन यांच्या मते " राज्यघटना ही सर्वोच्च सरकारची रचना निश्चित करते. "

इतर सर्व कायदे यावर आधारित आहेत अर्थात सर्व कायदे, नियम व नियमावली भारतीय राज्यघटनेवर आधारितच आहेत. शासनाच्या सत्तेचे ते उगमस्थान आहे आणि त्यानुसारच प्रशासन प्रकारचे स्वरूप, रचना कार्य व सत्ता निश्चित होते.

भारतामध्ये राज्यघटनेपेक्षा उच्च कोणीही नाही. यामध्ये राष्ट्रपती व पंतप्रधानांचा देखील समावेश होतो. त्यांना देखील राज्यघटनेतील तरतुदींचे पालन करणे बंधनकारक असते. अशा या राज्यघटनेमध्ये सर्वच घटक महत्त्वपूर्ण असतात. भारताची राज्यघटना सर्वोच्च कायदा आहे. हा दस्तऐवज मूलभूत राजकीय संहिता, संरचना, कार्यपद्धती, अधिकार आणि शासन संस्थेची कर्तव्य आणि मूलभूत अधिकार, मार्गदर्शक तत्वे आणि नागरिकांची कर्तव्य निर्धारित करणारी चौकट आहे. राज्यघटना म्हणजे देशाचा सर्वोच्च कायदा मानला जातो. त्यामुळे प्रत्येक देशाचा राज्यकारभार करण्यासाठी राज्यघटना ही महत्त्वपूर्ण भूमिका पार पाडत असते. जगामध्ये प्रत्येक देशाने आपली स्वतःची राज्यघटना निर्माण केलेली आहे. त्या राज्यघटनेनुसारच त्या देशाचा राज्यकारभार चालला जातो. म्हणून कोणत्याही देशाचा राज्यकारभार करण्यासाठी राज्यघटनेची आवश्यकता असते राज्यघटना म्हणजे त्या देशाचा सर्वोच्च एक अमूल्य दस्तऐवज मानला जातो.

भारतीय राज्यघटना ही घटना समितीने निर्माण केलेली आहे. जगातील सर्वात मोठी आणि विस्तृत राज्यघटना म्हणून आपण भारतीय राज्यघटनेकडे पाहतो. भारतीय राज्यघटनेमध्ये सुरुवातीस 395 कलमे व 8 परिशिष्ट होती. आज भारतीय घटनेत 448 कलमी असून ती 24 भागात विभागली गेली आहेत. या घटनेत सध्या बारा परिशिष्ट आहेत. प्रसंग परत्वे वेळोवेळी त्यामध्ये वाढ होत आहे. या भारतीय राज्यघटने मध्ये अनुसूचित जाती या प्रवर्गाचा समावेश केलेला आहे. यामध्ये आपण अनुसूचित जाती म्हणजे काय या संकल्पनेचा अभ्यास करणार आहोत.

**अनुसूचित जाती -**

अनुसूचित जाती ही संज्ञा प्रथम सायमन कमिशनने वापरली व तीच पुढे 1935 च्या कायद्यात अंतर्भूत करण्यात आली. सामान्यतः अस्पृश्य मानल्या गेलेल्या जातींचा समावेश अनुसूचित जातीत होतो. 1935 च्या कायद्याच्या परिशिष्टात अशा अनुसूचित जातींची पहिली अधिकृत यादी प्रकाशित करण्यात आली.

**अनुसूचित जाती**ची **व्याख्या**

"भारतीय राज्यघटनेतील कलम 341 अन्वये अनुसूचित जाती म्हणून गणल्या गेलेल्या अशा जाती, वंश किंवा जमाती किंवा अशा जमातीमधील भाग किंवा गट होय."

अनुसूचित जातीं मध्ये एकूण 59 जातींचा समावेश होतो. 2011 सालच्या जनगणनेनुसार भारतात 20 कोटी 13 लाख अनुसूचित जातीचे लोक आहेत. म्हणजेच एकूण लोकसंख्येच्या (16.6%) इतके आहेत. तर, राज्यात अनुसूचित जातींची लोकसंख्या 1,3275,898 (11.81%) असून त्यात पुरुष 67,67759 व स्त्रिया 65,08139 आहेत. भारतातील एकूण 20.14 कोटी अनुसूचित जाती पैकी 6.6% अनुसूचित जाती महाराष्ट्रात आहेत. अनुसूचित जाती व अनुसूचित जमाती आदेश ( सुधारणा) कायदा 1976 (1976 चा 108 वा ) मधील परिशिष्ट 1 मधील भाग 10 मध्ये नमूद केल्याप्रमाणे अनुसूचित जाती ह्या आरक्षित वर्गातील 59 प्रकारच्या जातीसाठी एकूण आरक्षण 13% आहे.

2001 च्या जनगणनेनुसार, अनुसूचित जाती ह्या आरक्षित वर्गामध्ये महार (57.5%) मांग (20.3%), भांबी,/ चांभार (12.5%) व भंगी (1.9%) या प्रमुख चार समाजाची लोकसंख्या 92% आहे.

भारतातील एकूण लोकसंख्येच्या अनुसूचित जातींची लोकसंख्या 16.6% आहे. तर महाराष्ट्रात 11.81% अनुसूचित जातींची लोकसंख्या आहे.

हिंदू समाजातील वर्णव्यवस्थेने एक जातीची उतंरड निर्माण केली. यामध्ये ब्राह्मण, क्षत्रिय, वैश्य व शूद्र हे चार वर्णाचे रूपांतर नंतर जातीमध्ये परावर्तित झाले आहे. त्यामुळे अस्पृश्य, मागास, दलित जातीचा समावेश अनुसूचित जातीत केला जाऊ लागला. ब्रिटिश राज्यकर्त्यांनी अनुसूचित जातीच्या लोकांसाठी शिक्षणाचा मार्ग अंशतः खुला केला. राज्यकर्त्यांच्या मार्गदर्शनासाठी निरनिराळ्या प्रांतातील लोकांची जातवार मोजणी करून त्यांच्या चाली- रीतीची माहिती जमा करण्यात बोरॅडेल व स्टील यासार सारखे ब्रिटिश अधिकारी 1826 पासूनच प्रयत्न करीत होते. त्या माहितीच्या आधारे सामाजिक, सुधारणा विषयक काही कायदे करण्यात आले.1856 साली धारवाड मधील सरकारी शाळेत एक महार मुलास प्रवेश नाकारल्यामुळे उद्भवलेल्या प्रश्नावरून तेव्हाच्या मुंबई प्रांत सरकारने 1858 साली एक पत्र काढले व त्या पत्रकात ज्या शाळेत केवळ जात अगर वंश यांच्या आधारे मुलांना प्रवेश नाकारण्यात येईल, त्या शाळेची सरकारी मदत सरकार बंद करू शकेल.

1925 मध्ये मद्रास सरकारने एक कायदा करून धर्मशाळा, विहिरी, बाग वगैरे सार्वजनिक ठिकाणी सर्व जातींसाठी खुला प्रवेश जाहीर केला.

अश्या या भारतीय राज्यघटनेमध्ये समाजातील उपेक्षित, दुर्लक्षित घटकाला सामावून घेण्यासाठी त्यांच्या उन्नतीसाठी काही विशेष घटनात्मक तरतुदी केल्या आहेत.

**अनुसूचित जातीसाठी घटनात्मक तरतुदी**

स्वतंत्र भारताने लोकशाही शासन पद्धतीचा स्वीकार केलेला आहे. लोकशाहीमध्ये सर्वच गटांचा समान विकास अभिप्रेत असतो. हा समान विकास साध्य करण्यासाठी वर्षानुवर्ष वंचित असलेल्या अनुसूचित जातींचा विकास व कल्याण या गोष्टीला प्राधान्य देणे क्रमप्राप्त ठरते. अनुसूचित जातीसाठी घटनात्मक तरतुदी पुढीलप्रमाणे स्पष्ट करता येईल.

**अ.घटनेच्या सरनाम्यात असलेल्या घटनात्मक तरतुदी-**

1)सामाजिक, आर्थिक व राजकीय न्याय –

भारतीय राज्यघटनेच्या सरनाम्यात सर्व भारतीय नागरिकांना सामाजिक, आर्थिक व राजकीय न्याय मिळवून देण्याची हमी देण्यात आली आहे. असा न्याय मिळवून देताना अनुसूचित जातींना विशेष प्राधान्य देण्यात आले आहे.

2)स्वातंत्र्य, समता व बंधुता विषयी तरतुदी –

भारतीय राज्यघटनेच्या सरनाम्यात स्वातंत्र्य, समता व बंधुत्वाची हमी दिलेली आहे. यामधील स्वातंत्र्य व बंधुत्वाची हमी देताना घटनाकारांनी समाजातील वंचित वर्गाचा प्रामुख्याने विचार केलेला आहे.

**ब) मूलभूत हक्का संदर्भातील तरतुदी –**

1) समानतेचा हक्क

कलम 15 नुसार धर्म, वंश,, लिंग किंवा जन्मस्थान या कारणावरून भेदभाव करण्यास मनाई –

राज्य कोणत्याही नागरिकाला प्रतिकूल होईल अशा प्रकारचे केवळ धर्म, वंश, जात, लिंग, भेदभाव करणार नाही या अनुच्छेदातील किंवा अनुच्छेद 29 चा खंड दोन यातील कोणत्याही गोष्टीमुळे नागरिकांच्या सामाजिक व शैक्षणिक मागासलेल्या कोणत्याही वर्गाच्या उन्नती करता अथवा अनुसूचित जाती व अनुसूचित जनजाती यांच्या करता कोणतीही विशेष तरतूद करण्यास राज्याला प्रतिबंध होणार नाही.

2) कलम 16 सार्वजनिक सेवा योजनेच्या बाबतीत समान संधी –

कोणताही नागरिक केवळ धर्म, वंश, जात, लिंग, कुळ, जन्मस्थान, निवास या किंवा यापैकी कोणत्याही कारणावरून राज्यांच्या कोणतेही सेवा योजना किंवा पद यांच्याकरिता अपात्र असणार नाही. अथवा त्यांच्या बाबतीत त्याला प्रतिकूल असा भेदभाव केला जाणार नाही.या अनुच्छेद आतील कोणत्याही गोष्टीमुळे राज्यांच्या सेवांमध्ये नागरिकांच्या कोणत्याही मागासवर्गाला राज्यांच्या मते पर्याप्त प्रतिनिधित्व नाही. अशा वर्गाकरिता नियुक्त पदे राखून ठेवण्यासाठी कोणतीही तरतूद करण्यास राज्याला प्रतिबंध होणार नाही.

3)कलम 17 नुसार अस्पृश्यता पाळणे हा कायद्यानुसार शिक्षा पात्र अपवाद असेल. याच कलमाला अनुसरून 1955 मध्ये अस्पृश्यता निवारण कायदा करण्यात आला व त्याच्यामध्ये वेळोवेळी सुधारणा करण्यात आली.

**क)मार्गदर्शक तत्त्वा अंतर्गत तरतुदी**–

भारतीय राज्यघटनेच्या चौथ्या भागात राज्याच्या धोरणाच्या मार्गदर्शक तत्त्वांचा समावेश करण्यात आलेला आहे. त्यालाच नितीनिर्देश तत्वे असे म्हटले जाते. मार्गदर्शक तत्वे राज्यघटने समाविष्ट करण्याचा हेतू म्हणजे सामाजिक व आर्थिक न्याय प्रस्थापित करणे हा आहे.

1)कलम 38 राज्याने लोककल्याणाच्या संवर्धनासाठी समाज व्यवस्था प्रस्थापित करणे –

राज्य त्यास शक्य होईल तितक्यात परिणामकारक रीतीने सामाजिक, आर्थिक व राजकीय न्यायाद्वारे राष्ट्रीय जीवनाच्या सर्व घटकांमध्ये प्रेरणा निर्माण करील अशी समाजव्यवस्था प्रस्थापित करून व तिचे जतन करून लोक कल्याणाचे संवर्धन करण्यासाठी प्रयत्नशील राहील. त्यासाठी उत्पन्नाच्या बाबतीत असलेली विषमता किमान पातळीवर आणण्यासाठी आटोकाट प्रयत्न करील, आणि दर्जा, सुविधा व संधी यांच्या बाबतीत असलेली विषमता नाहीशी करण्यासाठी प्रयत्नशील राहील.

2)कलम 46 नुसार अनुसूचित जाती, अनुसूचित जनजाती आणि इतर दुर्बल घटक यांचे शैक्षणिक व आर्थिक हितसंबंध –

राज्य जनतेतील दुर्बल घटक आणि विशेषतः अनुसूचित जाती, अनुसूचित जनजाती यांचे शैक्षणिक व आर्थिक हित संवर्धन विशेष काळजीपूर्वक करील, आणि सामाजिक अन्याय व सर्व प्रकारचे शोषण यापासून त्यांचे रक्षण करील.

**ड लोकसभेत राखीव जागा** –

राज्यघटनेच्या कलम 330 नुसार अनुसूचित जातीसाठी भारतीय संसदेच्या कनिष्ठ सभागृहात म्हणजेच लोकसभेत राखीव जागा ठेवण्याची तरतूद आहे. या राखीव जागांची संख्या ज्या त्या राज्य व केंद्रशासित प्रदेशातील लोकसंख्येवर आधारित असते. सुरुवातीला दहा वर्षांच्या कालावधीसाठी असलेली ही तरतूद वेळोवेळी प्रत्येक दहा वर्षांनी वाढवण्यात आली आहे.

**इ) विधानसभेत राखीव जागांची तरतूद** –

राज्यघटनेच्या कलम 332 नुसार राज्य विधिमंडळात कनिष्ठ सभागृहात म्हणजेच विधानसभेत संबंधित राज्याच्या लोकसंख्येनुसार अनुसूचित जातीसाठी काही जागा राखीव ठेवण्यात आले आहेत.

**ई) कलम 335 नुसार सेवा व पदे यावर अनुसूचित जाती व अनुसूचित जनजाती यांचे हक्क** –

संघराज्य किंवा राज्य यांच्या कारभाराचा संबंधातील सेवांमध्ये व पदावर नियुक्ती करताना अनुसूचित जाती व अनुसूचित जनजातीय यामध्ये व्यक्तींच्या हक्क मागण्या प्रशासनाची कार्यक्षमता राखण्याची सुसंगत असेल अशा रीतीने विचारात घेतल्या जातील.परंतु संघराज्य किंवा राज्य यांच्या कारभाराच्या संबंधातील कोणत्याही वर्गाच्या किंवा वर्गांच्या सेवांमध्ये किंवा पदावर बढती देण्याच्या बाबतीत आरक्षण करण्याकरिता अनुसूचित जाती व अनुसूचित जनजाती यामधील व्यक्तीसाठी कोणतीही परीक्षा उत्तीर्ण होण्यासाठी आवश्यक असलेली गुणमर्यादा शिथिल करण्याच्या दृष्टीने किंवा मूल्यमापनासाठी आवश्यक असलेल्या गुणवत्तेचे प्रमाण कमी करण्याच्या दृष्टीने कोणतीही तरतूद करण्यासाठी या अनुच्छेदातील कोणत्याही गोष्टीमुळे प्रतिबंध होणार नाही.

उ ) कलम 341 या कलमानुसार संघराज्याच्या संदर्भात राष्ट्रपतींना व राज्याच्या बाबतीत राज्यपालांना अनुसूचित जाती संवर्गाच्या यादीमध्ये नवीन जातीचा समावेश करण्याचा अधिकार आहे.

**ऊ ) प्रौढ मताधिकाराच्या अधिकाराची तरतूद -**

कलम 326 -

स्वातंत्र्यापूर्वी काही मर्यादित लोकांच्या वर्गांना असलेला मतदानाचा अधिकार नष्ट होऊन. कलम 326 नुसार वय वर्ष 18 पूर्ण करणाऱ्या प्रत्येक भारतीय नागरिकाला मतदानाचा अधिकार मिळाला आहे.

**निष्कर्ष**

1) राज्यघटनेच्या संकल्पनेचा अभ्यास करण्यात आलेला आहे.

2) अनुसूचित जाती या संकल्पनेचा अभ्यास केलेला आहे.

3) भारतीय राज्यघटनेतील अनुसूचित जातीशी संबंधित घटनात्मक तरतुदींचा आढावा घेण्यात आलेला आहे.

4) भारतीय राज्यघटनेमध्ये अनुसूचित जातींच्या संबंधित असलेल्या घटनात्मक तरतुदीमुळे वर्षानुवर्ष वंचित असलेल्या समाजातील हा घटक काही प्रमाणात समाजाच्या मुख्य प्रवाहात आलेला आहे.

**संदर्भ**

1) संकलन चौधरी राजेश अशोक, भारताचे संविधान (2023), चौधरी लॉ पब्लिशर्स पुणे 411030

2)प्रा. घांगरेकर. चि. ग., प्रा गर्गे. स. मा. प्रा. पाटील. व्ही. बी. आणि के सागर, संपूर्ण राज्यशास्त्र (2017), के सागर पब्लिकेशन हाऊस पुणे 411002

3) जाधव तुकाराम, शिरापूरकर महेश, भारतीय संविधान व भारतीय राजकारण (महाराष्ट्राच्या विशेष संदर्भासह भाग एक) (2012), द युनिक अकॅडमी प्रकाशन पुणे 411004

4) प्रा. घांगरेकर. चि. ग., भारतीय राज्यघटना स्वरूप आणि राजकारण (2015), श्री मंगेश प्रकाशन नागपूर 440010

5) मेल्लल्ली प्रवीणकुमार, भारतीय राज्यघटना व्यावसायिक नीती मूल्य आणि मानवी हक्क (2017) सेज पब्लिकेशन इंडिया प्रायव्हेट लिमिटेड न्यू दिल्ली 110044

6) प्रा.डॉ. गव्हाणे किशोर कुमार, प्रा. डॉ. शिंदे सुखदेव व प्रा. डॉ. कुलकर्णी जयश्री रमेश, भारतीय राष्ट्रीय चळवळीचा इतिहास (2015), प्रकाशक एज्युकेशनल पब्लिशर्स, अँड डिस्ट्रीब्यूटर औरंगाबाद.

7)डॉ. कोठेकर शांता, आधुनिक भारताचा इतिहास (2013), श्री साईनाथ प्रकाशन नागपूर.

8)डॉ. आंबेडकर. बी. आर., संपादन प्रा. डॉ. लोखंडे शशिकांत, भारतीय संविधान (2023), सविरो प्रकाशन गृह पालघर 401303

9) खंडागळे चंद्रकांत, भारतीय राज्यघटना आणि राजकीय व्यवस्था (2019), प्रकाशक अक्षर दालन कोल्हापूर.